सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. २९ नोव्हेंबर २०२५

**नगरपरिषद व नगरपंचायतींच्या मतदानासाठी २ डिसेंबरला सार्वजनिक सुट्टी**

मुंबई, दि. २९ (रानिआ): नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने अधिसूचनेद्वारे २ डिसेंबर २०२५ रोजी मतदानाकरिता संबंधित क्षेत्रात सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे.

निवडणूक होत असलेल्या नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या कार्यक्षेत्रासाठीच ही सर्वाजनिक सुट्टी असले. त्या दिवशी संबंधित क्षेत्रातील सर्व राज्य शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, महामंडळे, मंडळे, केंद्र शासनाची कार्यालये, सार्वजनिक उपक्रम आणि बँकांना सुट्टी असेल. विशेष म्हणजे कामानिमित्ताने संबंधित नगरपरिषद किंवा नगरपंचायतीच्या कार्यक्षेत्रा बाहेर असलेल्या मतदारांनाही आपला मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी त्यांनादेखील ही सुट्टी लागू असेल, असेही अधिसूचनेत नमूद केले आहे.

०-०-०

(Jagdish More, SECM)